० प्रकरण दुसरे ०

राजकारणात सक्रिय सहभाग

प्रकरण दुसरे

राजकारणात सक्रिय सहभाग

व्यक्तीच्या जीवनात असा एखादा प्रसंग एखदी घटना घडते की, ज्यामुळे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व अग्निदिव्यातून तापून सुलाखून निघलेल्या सुवर्णासारखे तेजपुंज ठरते. तुळशीदासांच्या आयुष्यातील मार्शल लॉ च्या वेळची घटना त्यांच्या आयुष्याला निराळी कलाटणी देण्याला कारणीभुत ठरली. तत्पुर्वी ते राजकीय चळवळीत भाग घेत असत. पण तो भाग आपली नोकरी सांभाळून आपल्या घराकडे लक्ष देऊन, पण मार्शल लॉ ची सात वर्षाची शिक्षा भोगून परत आल्यावर त्यानी आपले जीवन देशसेवेला सर्वस्वी वाहून घेतले होते.

येरवडयाच्या तुरूंगात शिक्षा भोगत असताना त्यांचे अनेक राजकीय नेत्याशी संबंध आला. तुळशीदासाबरोबर मुंबईचे श्री. एस्.के. पाटील व श्री. सयाजीराव सिलम यांचा संबंध आला. मार्शल लॉ च्या वेळी तुळशीदासांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता दाखवलेले धाडस त्या बद्दल त्याना त्यांचा आदर वाटत होता.

तुळशीदास येरवडयाच्या तुरूंगातून 13 महिने झालेली शिक्षा भोगून आल्यानंतर तुळशीदासांना सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस पद बहाल करण्यात आले. चिटणीसपद स्वीकारल्यानंतर तुळशीदासांनी जिल्हयाचा दौरा करून गोरगरीबांच्या अडचणी समजावून घेऊन दूर करण्याचा प्रयत्न केला. तसेच ठिकठिकाणी जाहीर सभा घेऊन कॉंग्रेसचे ध्येय तत्वप्रणाली समजावून दिली. तुळशीदासांची तुरूंगातून सुटका झाली व त्यांना जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे चिटणीसपद बहाल करण्यात आले. त्यावेळेसच सोलापूर जिल्हयामध्ये

दुष्काळाने वेढले होते. दुष्काळाच्या थैमानामुळे जनता हैराण झाली होती. लोकांना भाकरी मिळेना, कपडा मिळेना, गुराना चारा मिळेना हयामुळे जनावरे अन्नपाण्यावाचून तडफडू लागली होती. तेव्हा या भयंकर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी तुळशीदासांनी जिल्हयाचा दौरा काढून खेडयापाडयाना भेटी दिल्या. लोकांचे अन्न खाण्यास नसल्यामुळे ते किती हालाखिचे जीवन जगत आहेत हे पाहिल्यानंतर दुष्काळग्रस्त लोकांना धान्य आणि कपडे पोहचविण्याची त्यानी व्यवस्था केली. खरे वास्तविक पहाता दृष्काळग्रस्त भागाना मदत देणे हे सरकारचे काम असते. परंतु इंग्रजी सत्तेला येथील जनतेविषयी अजिबात आपुलकी नव्हती. जनतेला खाण्यासाठी अन्न मिळेना तेव्हा नौंदणी नावाच्या गावातील लोक 14/15 वर्ष राहिलेले धान्य खाण्याचा प्रयत्न करत होते. पेवातील जोंधळयाला अतिशय दुर्गंधी येत होती. तरीपण पोटाची आग भागविण्यासाठी ते लोक ते धान्य खाण्याचा प्रयत्न करत होते व खात ही होते. तेव्हा तुळशीदासांनी हरिजन वस्तीत जाऊन ते वापरत असलेले फाटके कपडे, पांघरीत असलेली चिंध्याची वाखळ बरोबर साहित्य घेऊन ते 1931 च्या पोटनिवडणुकीत कायदे मंडळाकडून आलेले आमदार श्री. डॉ. वैशंपायन यांना भेटण्यास गेले0 डॉ. वैशंपायन याना त्या गाठोडयातील भाकरीचे तुकडे आणि कपडे दाखवून तुळशीदास म्हणाले, "डॉक्टर साहेब आपल्या जिल्हयातील लोक या दुष्काळात कसे जगत आहेत याची तुम्हाला यावरून कल्पना येईल हे सगळे सरकारला दाखवून त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याची कामगिरी आता तुमची आहे" हे अन्न पाणी कपडे पाहून डॉक्टराना धक्काच बसला. मुंबई कायदेमंडळाचे अधिवेशन चालू झाल्यावर त्यांनी सर्व सभासदासमोर सोलापूर जिल्हयातील दु:ष्काळाचे ते गाठोडे सोडून दाखवले व ते सभागृहात म्हणाले, "दुष्काळाने त्रासलेले लोक या असल्या जोंधळयाची ही भाकरी खाऊन आणि या असल्या चिंध्या पांघरून जगत

आहेत. याची सरकारला जाणीव आहे काय ? असा हा प्रश्न ऐकून सभागृहात खळबळ उडाली. ब्रिटीश राज्यकर्त्यांच्या 116 वर्षाच्या कारकीर्दीत कायदेमंडळाचे अधिवेशन चालू असताना भर सभागृहात "भाकरी" चे हे पहिले प्रदर्शन होते. तेव्हा सभागृहात आणलेल्या भाकरी आणि चिंध्यांचा ढिग पाहून सर्व आमदारांचे अंतःकरण हेलावले. कायदेमंडळावर झालेले "भाकरीचे प्रदर्शन" ही पहिलीच घटना होती आणि ती ही तुळशीदासांच्या कल्पनेमुळे साकार झाली. [1]

तुळशीदासांनी सोलापूर शहरामध्ये सभा घेऊन खेडयापाडयातील दुष्काळ पिढीत लोक सध्या कशा प्रकारे जीवन जगत आहेत. हे सांगत होते. सोलापुरातील लोकांना त्यानी कशा प्रकारच्या ज्वारीच्या भाकरी खातात व कशी फाटकी कपडे घालतात हे त्यानी दाखवले व दुष्काळ पिडीताना मदत करण्याचे आव्हान त्यांनी केले. तेव्हा सभा संपल्यानंतर सोलापुरातील दानशूर कै. धर्मवीर रावजी सखाराम दोशी यांनी तुळशीदासांना बोलावून धान्य, कपडे देण्याचे आश्वासन दिले. तेव्हा दोशी यांनी सोलापूरातील व्यापा–याकडून कपडा गोळा करून तुळशीदासांच्या स्वाधीन सर्व कपडे केली व खेडोपाडी वाटण्याची त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

त्याच सुमारास 1934 मध्ये दिल्लीच्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणूमीत कॉंग्रेसतर्फे श्री. काकासाहेब गाडगीळ आणि श्री. केशवराव जेधे उभे होते. त्यांच्या प्रचारार्थ तुळशीदासांवर प्रचाराची जबाबदारी सोविण्यात आली होती. तेव्हा त्यांनी एक महिना खेडयापाडयातून दौरा काढून अतिशय कष्ट घेऊन प्रचार कार्य केले. त्यानी एकेका दिवशी तर आठ–आठ, दहा–दहा खेडयात सभा घेतल्या. कित्येक वेळा त्यांना पायी चालत जाऊन सभा घ्याव्या लागत होत्या. [2]

सोलापुरमधील प्रभात टाकीज ही राजकीय सामाजिक साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्य करणा–या कार्यकर्त्यांचा अड्डा होता. तेथेच अनेक संम्मेलने भरली होती. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन येथेच भरले होते. 1935 साली कॉग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रात भरण्याचे आमंत्रण महाराष्ट्र प्रांतिक कॉग्रेस कमिटीचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी दिले होते. तेव्हा "सोलापूर समाचार" चे त्यावेळचे उप–संपादक श्री. व्यंकटेश गोपाळ अंदुरकर व प्रभात टॉकीजचे मालक श्री. शंकर गोविंद पटवर्धन यांनी यंदाचे अधिवेशन सोलापूर येथे घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला. त्याप्रस्तावाला सर्वांनी सहमती दर्शविली.

हे अधिवेशन सोलापूरला भरविण्यात यावे हे विषद करताना त्यांनी असे सांगितले की 1930 साली सोलापुरात पुकारलेल्या मार्शल लॉ च्या राक्षसी कारकिर्दीत अनेकावर केलेले अन्याय, अत्याचार, लुटालुट व निरपराध लोकांना गो–या अधिका–यांनी दिलेल्या शिक्षा हया सर्व परिस्थितीची कॉग्रेस अधिवेशनाच्या व्यासपिठावरून स्वागताध्यक्षांच्या भाषणतून प्रगट करून ब्रिटिशांच्या ढोंगी वृत्तीची जगाला माहिती द्यावी. या सर्वाला कारणीभूत असलेल्या जिल्हाधिका–याला शिक्षा द्यावी. फाशी गेलेल्या हुतात्म्यांच्या वारसाना व निरपराध लोकांचे मुडदे पाडले अशांच्या वारसांना कायम स्वरूपाची वंशपरंपरा अशी इस्टेट मिळवून द्यावी. असे अनेक ठराव करून व ही कार्य करण्यासाठी कृती समिती नेमून आंदोलन करण्यासाठी आवश्यकता आहे असा उद्देश होता.

महाराष्ट्र प्रांतीक कॉग्रेसचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव हे होते. त्यांचे महाराष्ट्रातील जनतेवर चांगलेच वजन होते. यंदाचे महाराष्ट्रातील कॉग्रेस अधिवेशन खेडयात भरवावे तशी इच्छा त्यांनी

जाहिरही केली होती. तेव्हा हे अधिवेशन सोलापुरला भरवण्यात यावे म्हणून तेथील लोकांनी तशी तयारीही सुरू केली होती. त्यानी हे अधिवेशन भरवण्यासाठी सोलापूर जिल्हयातील 'टिकेकरवाडी' जवळील मैदान निवडले होते. टिकेकरवाडीला अधिवेशन भरवले तर ते खेडयात भरवल्यासारखेही होईल. त्या ठिकाणी पाण्याची सोय नव्हती तर सोलापूर म्युनिसिपालिटीने तेथे पाईप लाईन टाकून पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन सोलापूर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष डॉ. रा.ब. मुळे यांनी दिले होते. सोलापुरचे उद्योगपती शेठ वालचंद हिराचंद यानी अधिवेशनाला येणारा खर्च भागवण्याचे आश्वासन दिले होते. त्याचवेळी श्री. शंकरराव देव सोलापूरला आले होते. तेव्हा त्याना भेटून "सोलापूर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरवण्याची आम्हाला संधी द्यावी" अशी विनंती श्री. तुळशीदास जाधव व कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष रामकृष्ण जाजु यानी शंकरराव देव यांना केली. परंतु शंकरराव देव यांनी नकार दिला. तेव्हा शेवटचा मार्ग म्हणजे लोकशाही पध्दतीने म.प्रा. कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत बहुमत करून घेऊन अधिवेशन सोलापूरकरांच्या पदरी घेणे एवढाच मार्ग होता. त्यावेळेस महाराष्ट्र प्रा. कॉ. कमिटीचे स्थानिक सदस्य श्री. तुळशीदास जाधव, रामकृष्ण जाजु व श्री. कृ.भी अंत्रोळीकर हे तिघे होते. जाधव जाजु यांची अधिवेशनाला अनुकूलता होती.परंतु डॉ. अंत्रोळीकर यांचा पाहिजे तेवढा प्रतिसाद नव्हता. सोलापूरमध्ये अधिवेशन भरवण्याचा उद्देश शेठ वालचंद हिराचंद यानी पत्करलेली खर्चाची जबाबदारी आणि म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष श्री. रा.ब. मुळे यांनी सर्वतोपरी सहा'य करण्याचे दिलेले आश्वासन वगैरे हकिकत अंदुरकरानी अंत्रोळीकर व म.प्रां. कॉंग्रेस कमिटीच्या सदस्यांना समजावून सांगितली. महाराष्ट्रातील जनतेचा पाठींबा मिळावा म्हणून श्री. तुळशीदास जाधव व श्री रामकृष्ण जाजु यांनी सभासदांची मने वळवून आणि ठिकठिकाणी सभा घेऊन अधिवेशनाचे बाजुने अनुकूल वातावरण निर्माण केले आणि त्यांनी

स्वखर्चाने महाराष्ट्रातील दौरा केला. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. शेवटी महाराष्ट्र प्रांतीक कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनामध्ये अधिवेशन सोलापूरला भरवायचे की फैजपुरला या विषयाचा ठराव सभेत मांडण्यात आला. असा विषय सभेपुढे आल्यानंतर श्री. शंकरराव देव व श्री तुळशीदास जाधव व श्री. रामकृष्ण जाजु यांचे गट निर्माण झाले.

शंकरराव देव हे फैजपुरचे समर्थक होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये फैजपुरचे समर्थन केले. त्यामुळे कांही लेचेपेचे सभासद जे सोलापूरला अनुकूल होते ते बारगळले. कांही सभासदाना भविष्य काळात मानाच्या जागेवर बसवण्याचे अमीष दाखवून शंकरराव देव आणि फैजपुरच्या बाजूने मतदान करण्याचे सांगितले आणि श्री. तुळशीदास जाधव यांनी सर्व दृष्टीने सोलापूरला अधिवेशन भरवणे कसे औचीत्यपूर्ण आहे हे आपल्या परिणामकारक भाषणाने पटवून दिले. तुळशीदासांच्या भाषणाला पाठिंबा देताना श्री. रामकृष्ण जाजु यांनी आपल्या हिंदी भाषणातून ब्रिटीशांची कुटील निती जगाच्या निदर्शनास आणून देण्याची संधी द्यावी अशी मागणी केली व शेवटी मतदान घेण्यात आले. परंतु शंकरराव देवांनी प्रलोभनाचे जाळे टाकूनही त्यांच्या बाजूस 'एक' मत अधिक पडले आणि तेही सोलापूरच्या सभासदाचे आणि शेवटी जाजुजी व श्री. तुळशीदास जाधव यानी सोलापूरला खेचून आणलेले अधिवेश एका मताच्या जोरावर फैजपुरला गेले. यावरून हे सिध्द होते की श्री. तुळशीदास जाधव यांचे म.प्रा. कॉंग्रेस कमिटीत किती वजन होते. जाजुर्जीनी त्याना किती सहकार्याची भूमिका घेतली होती.[3]

फैजपूर की सोलापूर या प्रतिष्ठेच्या प्रश्नावर अवघ्या एका मताने पराभव स्वीकारावा लागला आणि तुळशीदासांनी तो पराभव पचवला. पक्षाची शिस्त त्यानी मोडू दिली नाही.

फैजपुरच्या अधिवेशनाच्या खर्चासाठी ठरवलेला निधी इतर कार्यकर्त्यांच्या समवेत गोळा करण्यास त्यानी सुरूवात केली व थोडयाच अवधीत दिलेला अवधी त्यानी पूर्ण केला. फैजपुरला खेडयात झालेल्या पहिल्याच अधिवेशनास अपेक्षपेक्षा जास्त गर्दी झाली होती. स्वागताध्यक्ष शंकरराव देव होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पंडीत जवाहरलाल नेहरू हे होते. अशा प्रकारे म.प्रा. कॉंग्रेस अधिवेशनाच्या सभेत ठिकाणाबाबतच्या मतदानाच्या ठरावात जाजुनी व तुळशीदास जाधव यांचा पराभव झाला असताना कोणत्याही प्रकारचा मनात संकोच न ठेवता फैजपूर अधिवेशनाला सर्वतोपरी मदत केली. फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनात कौन्सील प्रवेशाचा ठराव बहुमताने पास होऊन 1937 ची निवडणूक लवढवण्याची पहिली संधी कॉंग्रेसला मिळाली.

ज्यावेळी भारतीय स्वातंत्र्य लढयाची सूत्रे महात्मा गांधींनी आपल्या हाती घेतली तेव्हापासून फेर–नाफेर हा वाद चालू होता. कौन्सील प्रवेश करावा म्हणणारे नाफेरवाले होते असे दोन गट होते. महात्मा गांधीमुळे नाफेर वाल्याना कॉंग्रेसचा पाठींबा मिळाला. फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनात कौन्सील प्रवेशाचा ठराव प्रचंड बहुमताने पास झाल्याने त्यास कॉंग्रेसचा अधिकृत पाठींबा प्राप्त झाला. कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणे अधिकृतरित्या कॉंग्रेसतर्फे निवडणूक लढवण्याची 1937 ही पहिली निवडणूक होती.

तुळशीदासांची 1937 ची पहिली सार्वत्रिक निवडणूक –

1937 ची पहिली सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. सोलापूर जिल्हयाच्या नैऋत्य भागाच्या (बार्शी, करमाळा, सोलापूर व माढा हया चार तालुक्यात त्या भागाचा मतदार विभाग होता.) ग्रामीण भागासाठी तुळशीदासजी आणि बार्शीचे भगवंत शंभुअप्पा कथले यांना शहरी भागातून मुंबई

असेंबलीसाठी कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून उभे करण्यात आले होते. कथले यांना राजकीय धकाधकी माहित नव्हती. त्यानी प्रचाराची सर्व जबाबदारी तुळशीदासावर टाकली होती. कथले यांनी शहरी भागाची जबाबदारी स्वीकारली तर तुळशीदासांनी खेडया–पाडयात हिंडून सभा, बैठका घेऊन लोकांना आपले विचार पटवून देत होते. सभेला त्याना पायी चालत जावे लागत. एखाद्या खेडयात सभा घ्यावयाची असल्यास लोकांना बोलावून आपले विचार सांगत. त्यावेळेस मोटार गाडयांची सोय नव्हती. तेव्हा ते सायकल वरून बैलगाडीतून जाऊन आपले विचार सर्व सामान्यांच्या अंतःकरणापर्यंत पोहचवले. त्यांच्या विरोधात मातब्बर नेते मंडळी होती. लोकशाही स्वराज्य पक्षाचे श्री. वालचंद रामचंद्र कोठारी, सोलापूरचे प्रसिध्द वकील श्री. अण्णासाहेब गव्हाणे, श्री. जयसिंगराव पवार अशा बहुजन समाजात मान्यता पावलेल्या प्रतिष्ठित मातब्बर उमेदवाराशी त्यांचा सामना होता. त्यावेळी त्यानी खेडयातील अशिक्षित बांधवाना कॉंग्रेसचे ध्येय–धोरण त्याना पटेल अशा साध्या सोप्या भाषेत सांगत होते. तुळशीदासांचा स्वतःवर फार विश्वास होता. स्वतःची इभ्रत आणि कॉंग्रेसची प्रतिष्ठा या दोन्हीही जबाबदा–या तुळशीदासावर होत्या. तुळशीदासांनी सर्व खेडी–पाडी ढवळून काढली होती. प्रत्येक मानूस तुळशीदासांच्या प्रचाराने भारावला होता. ते आपल्या भाषणात सांगत होते, पहिले मत श्री. कथले यांना द्या व दुसरे मत मला द्या. त्यांचा विजय म्हणजे माझा विजय होणार आहे. आणि त्यांचा पराभव म्हणजे माझा पराभव आहे. तेव्हा या तुळशीदासांच्या शब्दाला लोकानी किंमत देऊन श्री. कथले यांना 13757 मते मिळाली तर तुळशीदासांना 13089 मते मिळून दोघेही निवडून आले. त्यावेळी सोलापूर जिल्हयात शंभर टक्के कॉंग्रेस यशस्वी झाली. या विजयाचे श्रेय तुळशीदासांनी सर्व जनतेला व त्यांचे सहकारी असणारे रामकृष्ण जाजु डॉ. अंत्रोळीकर, राठी, बाबुराव जोशी या आपल्या सहकार्यांना दिले.[4]

मुंबईच्या असेंबलीमध्ये कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले होते. उत्तर सोलापूर या मतदार संघातून तुळशीदास जाधव हे मुंबई असेंबलीमध्ये निवडून आले होते. कॉंग्रेस पक्षाला बहुमत असताना सुध्दा त्यानी सरकार स्थापन केले नव्हते. तेव्हा असेंबलीमध्ये सर धनजीशा कुपर यांचे तात्पुरते (इंटिरियम) मंत्रीमंडळ अस्तित्वात येऊन राज्यकारभार सुरू झाला होता. त्यानी बॅ. जमनादास मेहता – कंबळी प्रभुर्तीचे सहकार्य घेऊन हंगामी मंत्रीमंडळ बनवले होते. मंत्रीमंडळ बनवण्याचा प्रश्न आला तेव्हा गांधीजींनी अट घातली की, "मंत्रीमंडळ सनदशीर मार्गाने काम करत असता स्वतःचे विशेष अधिकार आपण चालवणार नाही व मंत्रीमंडळाचा सल्ला आपण झिडकारणार नाही असे आश्वासन कॉंग्रेसच्या विधी मंडळात पक्षाच्या नेत्यानी आपाआपल्या प्रांताच्या गव्हर्नरकडून घ्यावे" परंतु गव्हर्नरकडून अशी आश्वासने न मिळाल्याने त्याने आपले सरकार स्थापन केले नाही व कुपर यांचे मंत्रीमंडळ कारभारात ब्रिटीश गव्हर्नर हस्तक्षेप करणार नाही ही अट मान्य झाल्यावर कॉंग्रेस पक्षाने सुत्रे हाती घेतली. त्यावेळी देशात एकूण 13 प्रांत होते. 12 प्रांतात कॉंग्रेसची सरकारे अस्तित्वात आली. परंतु प्रथम मुंबई असेंबलीमध्ये तशी परिस्थिती नव्हती. 175 पैकी कॉंग्रेसचे 84 व 91 आमदार विरोधी पक्षाचे निवडून आले होते. परंतु विरोधी पक्ष आमदारांचे पक्षाच्या कार्यक्रमावर एकमत न झाल्याने त्यांचे सरकार सत्तारूढ होऊ शकले नाही. मुंबई प्रांतात कॉंग्रेस पक्षाचे बहुमताने बरेच आमदार निवडून आले होते. तेव्हा सर्वांच्यापुढे नवीन मुख्यमंत्री कोण हा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी सर्वांचे लोकप्रिय नेते श्री. नरीमन हे होते. त्यांची मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यासाठी तुळशीदासजी व त्यांचे 20/25 सहकारी खटपट करत होते. बहुतेक आमदार नरीमन यांना मुख्यमंत्री करावे या प्रयत्नात होते. परंतु कै. हरीभोऊ तुळपुळे, पुणे यांच्या घरी मिटींग घेऊन श्री. शंकरराव देव यांनी सरदार वल्लभाई पटेल यांची भेट घेऊन मा. बाळ

13782

गंगाधर खेर यांची पार्टीप्रमुख म्हणजे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्याचे ठरले. ब्राह्मणेत्तर पक्षाचे सेक्रेटरी राऊत व शेतकरी कामगार पक्षाचे कानजी करसन हे दोन आमदार कॉंग्रेसमध्ये सामील झाले आणि त्यांनी आपले मंत्रीमंडळ नेतेपदी निवड केली. बाळासाहेब खेर यांचे मंत्रीमंडळ मुंबई असेंबलीमध्ये अस्तित्वात आले. बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मुंबई असेंबलीचा कारभार सुरू झाला. यांचे पहिले अधिवेशन पुणे येथे झाले होते. नंतर ती मुंबईला घेण्यात येऊ लागली.[5]

तुळशीदासानी आपल्या कार्याची छाप मुंबई असेंबलीमध्ये आले तेव्हा त्यांनी "कुळकायदा" जास्तीत जास्त कुळाचे बाजूने व्हावा अशा त–हेने प्रयत्न तुळशीदासांनी केला. या प्रयत्नास त्यांवेळचे आमदार श्री. ल.मा. पाटील, आ. भोऊसाहेब हिरे, श्री. के.बी. देशमुख, आ. वसंतराव नाईक, कथले प्रभुतीनी तुळशीदासांना साथ दिली.

महाराष्ट्रामध्ये 1937 च्या मुंबई असेंबलीमध्ये कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले तेव्हा सर्व सत्तास्थाने कॉंग्रेसने काबीज करावीत असे अखील भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीने ठरवले होते. त्याचे वेळेस सोलापूर जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक जाहीर झाली होती. लोकल बोर्डाच्या हया निवडणूकीला बार्शी भागातून कॉंग्रेसची उमेदवारी तुळशीदासांना दिली होती. याही निवडणूकीत ते प्रचंड मतानी निवडून आले. सर्व निवडून आलेल्या सभासदांची बैठक दि. 6 जुलै, 1938 रोजी भरली. या सभेत जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक होणार होती. लोकल बोर्डाच्या निवडणूकीत खा. ब. अब्दुल लतिफ, श्री. मानाजीराव देशमुख, माढयाचे श्री. गणपतराव साठे, पंढरपूरचे श्री. रा.ब. परिचारक, आण्णासाहेब गव्हाणे इ. मातब्बर नेते मंडळी

निवडून आले होते. लोकल बोर्डाच्या 45 सदस्यापैकी कॉंग्रेस पक्षाचे 28 सभासद तर खा.ब. अब्दुल लतिफ यांच्या पार्टीचे 17 सभासद निवडून आले होते. कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले होते.[6]

सभेला सुरूवात होताच खा.ब. अब्दुल लतिफ यांनी सर्व निवडून आलेल्या सभासदांचे अभिनंदन केले व आजच्या सभेसाठी अध्यक्षांचे नाव सुचवण्याची विनंती केली. तेव्हा कॉंग्रेसतर्फे श्री. धुम्मा यांचे नाव श्री. पाटील यानी सुचवले. तर त्यास श्री. पांढरे यांनी अनुमोदन दिले. श्री. रा. ब. परिचारक यांनी खा. ब. अब्दुल लतिफ यांचे नाव सुचवले. त्यास श्री. मानाजीराव देशमुख यांनी अनुमोदन दिले. मतदान झाले तेव्हा धुम्मा यांना 30 मते पडली. तर खा. अब्दुल लतिफ यांना 14 मते पडली व धुम्मा यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. तेव्हा सोलापूर लोकल बोर्डाचे अध्यक्ष निवडण्यासाठी धुम्मा यानी सभासदांना विनंती केली तेव्हा अध्यक्ष पदासाठी पंढरपुरचे ॲड. श्री. बाबुराव जोशी यांनी श्री. तुळशीदास जाधव यांचे नाव सुचवले व त्यास श्री. सुलेमान बसुभाई यांनी अनुमोदन दिले. तर विरोधी पाटीतर्फे श्री. रा.ब. परीचारक यांनी खा.ब. अब्दुल लतिफ यांचे नाव सुचवले व त्यास श्री. गणपतराव साठे यांनी अनुमोदन दिले. धुम्मा यांनी उघड पध्दतीने मतदान घेऊन मते मोजली तेव्हा आ. तुळशीदास जाधव यांना 30 मते मिळाली व श्री. खा.ब. अब्दुल लतिफ यांना 14 मते मिळाली. तेव्हा आ. तुळशीदास जाधव यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे जाहीर केले. तेव्हा धुम्मा यांनी श्री. तुळशीदास जाधव यांना अध्यक्षांच्या खुर्चीवर नेऊन बसवले. तेव्हा शेठ जिवराज यांनी तुळशीदास जाधव यांना पहिला पुष्पहार घातला. आपल्याला दिलेल्या बहुमानाबद्दल श्री. तुळशीदास जाधव यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले.[7]

सोलापूर जिल्हा लोकल बोर्डाचा पहिला अध्यक्ष होण्याचा मान आ. तुळशीदास जाधव यांना मिळाला. तुळशीदासांनी अध्यक्ष झाल्यानंतर प्रत्येक ठिकाकणी स्वदेशीचा वापर सुरू केला. ज्या स्वदेशी वस्तुच्या वापरासाठी महात्मा गांधीनी आटापीटा केला होता. तो विचार त्यानी प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला. त्यानी अस्पृश्य निवारण्याचा पहिली पायरी म्हणून हरिजनासाठी विहीरी खुल्या केल्या. हे काम करत असताना 17 डिसेंबर, 1938 रोजी मा. मुरारजीभाई देसाई सोलापूरच्या दौ–यावर आले होते. तेव्हा तुळशीदासांनी त्यांचा मानपत्र देऊन सत्कार केला व मुरारजी भाईच्या हस्ते जिल्हा लोकल बोर्डावर तिरंगा झेंडा फडकावण्यात आला. तेव्हा भारताच्या इतिहासामध्ये भारताचा राष्ट्रध्वज स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यालयावर पहिल्यांदा उभारला गेला. हे प्रथमतः नमूद करावेसे वाटते. या गोष्टीवरून तुळशीदासांना भारतीय स्वातंत्र्याविषयी किती ओढा निर्माण झाला होता हे दिसून येते. त्यानी आपल्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत ग्रामीन जनतेच्या औषधाची सोय होण्यासाठी त्यानी नवीन 15 डॉक्टरांच्या नेमणूका केल्या. त्यानी सर्व खेडया–पाडयात जाऊन सर्व सामान्य लोकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला.[8]

जनहितासाठी अनेक कामे करत असताना तुळशीदासांनी अनेक गावाना भेटी दिल्या. त्यानी वैरागच्या लोकल बोर्डाच्या शाळेलाही भेट दिली तेव्हा त्यानी एक विद्यार्थी नसून सोलापूर जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष असताना ज्या शाळेत ते शिकले त्या शाळेला अध्यक्ष म्हणून भेट देत असताना त्यांचे अंतःकरण भरून आले. त्यांना जे शिक्षक शिकवत होते ते सेवानिवृत्त झाले होते. त्यानी वैरागला तुळशीदास आल्यानंतर त्यांचे मोठया अभिमानाने स्वागत केले. 1939 साली दुसरे महायुध्द सुरू झाले. हिटलरने आपल्या पराक्रमाने एक–एक देश जिकून जगाचे स्वामीत्व मिळविण्याच्या प्रयत्नात होता. जेव्हा हिटलरचा प्रभाव वाढत चालला तेव्हा इंग्लंडने त्याला

रोखण्यासाठी आल्या अधिपत्याखाली असलेल्या देशाने युध्दात उतरवण्याचे आवाहन केले. भारताला ही त्यानी दुध्दात उतरण्यास सांगितले. तेव्हा महात्मा गांधीनी त्यांना सांगितले की, आम्ही तुम्हाला मदत करून पण भारतीय 40 कोटी जनतेचे काय करणार ? अगोदर आम्हाला स्वातंत्र्याची हमी द्या. तेव्हा व्हाईसरॉयनी 1935 च्या घटना कायद्याच्या फेडरल घटनेचा फेरविचार इतर पक्ष, गट, इतर संस्थाने व ब्रिटीश सरकार वगैरे सर्वांच्या सल्ल्याने युध्द संपल्यावर करू अशी घोषणा दि. 17 ऑक्टोबर, 1939 "हॅलो हेराळ" पत्राने गांधीजीना केली. इंग्लंडमधील अधिका–यांनी गांधीजी व कॉंग्रेस यांच्या फोडा व झोडा ही निती अवलंबण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गांधीजींनी सर्वांना आवाहन केले की, आपल्यातील मतभेद विसरून एकत्र यावे. सर्व मंत्रीमंडळानी राजीनामे द्यावे व वेळप्रसंगी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला पाहिजे असे सांगितले.

तेव्हा गांधीजींच्या आदेशान्वये सर्व कॉंग्रेसच्या आमदारानी राजीनामे गव्हर्नर कडे सादर केले. तेव्हा 93 च्या कलमान्वये राज्यकारभाराचे व कायदेमंडळाचे अधिकार गव्हर्नरने आपल्याकडे घेतले. थोडयाच दिवसात गांधीजींच्या आदेशानुसार सत्याग्रह सुरू झाला. तेव्हा तुळशीदासानी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला म्हणून त्यांना अटक करण्यात आली व 1 वर्षाची शिक्षा फर्मावण्यात आली. ही शिक्षा भोगण्यासाठी तुळशीदासांना नाशिकच्या तुरूंगात पाठवण्यात आले. तेव्हा त्यांना छातीचा आजार सुरू झाला. या आजारामुळे त्यांच्या छातीला प्लॅस्टर करून जेलच्या दवाखाण्यात दोन महिने ठेवण्यात आले. नाशिक जेलमध्ये असताना श्री. तुळशीदासांनी श्री. एस्.के. पाटील यांच्या सानिध्यामुळे इंग्रजी सुधारण्यात बराच उपयोग झाला.

1942 च्या स्वातंत्र्यलढयातील तुळशीदासांचा सहभाग –

दि. 8 ऑगस्ट, 1942 रोजी मुंबईत भरलेल्या अ.भा. कॉंग्रेस कार्यकारिणीने 'चलेजाव' चा ठराव मंजूर केला व 'लढेंगे या मरेंगे' ची घोषणा केली. त्याच दिवशी पहाटे सर्व कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सर्व सभासदांना मुंबईत अटक करून त्यांची रवानगी अहमदनगरच्या ऐतिहासिक किल्ल्यात स्थानबद्धतेत केली. त्याच वेळेस सोलापूर शहरात जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष रामकृष्ण जाजु श्री. तुळशीदास जाधव व डॉ. अंत्रोळीकर इत्यादी नेत्याना अटक करून विजापुरच्या कारागृहात डांबुन ठेवून नंतर कांही दिवसांनी येरवडयाच्या रेफरमेटरीमध्ये आणून ठेवले.

या सुमारास येरवडयाच्या तुरूंगात तुळशीदास जाधव मोरारजी देसाई, बाळासाहेब खेर, बॅ. नुरी, रावसाहेब पटवर्धन, साने गुरूजी यांना फांशीगेटच्या खोलीत ठेवले होते. तुरूंगात असताना बाळासाहेब खेर हे महाभारत वाचत होते व सर्वजन मन लावून ऐकत होते. साने गुरूजी ही मोठमोठे लेख लिहित होते. इत्यादी महाराष्ट्रातील वरील श्रेष्ठ कार्यकर्त्यांचा सहवास तुळशीदासांना लाभला. त्यांचा त्याना श्रान वाढविण्यासाठी प्रयत्न केला. ते तुरूंगात असतानाच त्यानी आपल्या कन्येच्या लग्नाची तयारी केली व चले जावच्या लढयात साता–या जिल्हयातील कलेढोन गावचे तरून तडफदार कार्यकर्ते बाबासाहेब भोसले हे ही विजापूर–विसापूरच्या तुरूंगात शिक्षा भोगत होते. त्यावेळेस सोलापूर जिल्हयातील बरीच नेते मंडळी या तुरूंगात होती व सातारा जिल्हयातील आमदार चंडोजीराव पाटील आ. के.डी. पाटील ही मंडळीही जेलमध्ये होती. तुळशीदासाविषयी बाबासाहेबानी बरेच ऐकले होते. वरील उभय बाजूंच्या कार्यकर्त्यांच्या परिचयातून विवाहाचा विचार सुरू झाला व सातारचे बाबासाहेब भोसले व तुळशीदासांच्या जेष्ठ

कन्या कलावती यांचा विवाह बाबासाहेब दीड वर्षाची सजा भोगून आल्यावर दि. 20 जानेवारी, 1945 हया दिवशी लग्नाचा मुहुर्त ठरला. हे लग्न दे.भ. काकासाहेब गाडगीळ यांच्या उपस्थितीत साध्या पध्दतीने सोलापूर येथे पार पडले. या समारंभात पुण्याचे काकासाहेब गाडगीळ, सांगलीचे रामानंद भारती, सातारा जिल्हयातील यशवंतराव चव्हाण, पंढरपुरचे तात्यासाहेब गुर्जर, बबनराव बडवे इ. सातारा, सोलापूर जिल्हयातील असंख्य लोक उपस्थित होते.[9]

तुळशीदास 11 जानेवारीला तुरूंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी आपल्या सहकार्यासमवेत सोलापूर जिल्हा दौरा काढला व त्यानी चले जाव व महात्मा गांधीजींची तत्वप्रणाली सर्व जनतेला समजावून सांगितली. महात्मा गांधी व पंडीत जवाहरलाल नेहरू यांची सेवा ग्राम येथे बैठक भरली होती. त्यावेळेस तुळशीदास सेवाग्राम येथे होते. गांधीजी व नेहरू यांची चर्चा फिसकटली. त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला. तेव्हा कांही नेत्यांना असे वाटू लागले की जर या दोघांचे मतभेद झालेतर देशाचे कांही खरे नाही. परंतु कांही वेळानंतर दोघांनी मतभेद मिटवून चर्चेला सुरूवात केली.

1946 ची निवडणूक –

1946 च्या निवडणूकीमध्ये कॉंग्रेसचे सर्व देशभर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी महात्मा गांधी व पंडीत जवाहरलाल नेहरू प्रयत्न करत होते. तरी सुध्दा महाराष्ट्रातील कॉंग्रेसची सारी सूत्रे आपल्या हाती घेण्यासाठी गांधीवादी म्हणून घेणारे नेते धडपडत होते. कॉंग्रेसमध्ये शेतकरी संघ नावाचा एक मोठा गट होता. या गटाचे महाराष्ट्रातील बहुजन समजावर वजन होते. या गटामध्ये श्री. शंकरराव मोरे, केशवराव जेधे,तुळशीदास जाधव ही नेतेमंडळी होती. आणि हाच

गट गांधीवादी कॉंग्रेस श्रेष्ठीना जड वाटत होता. व हेच सत्ता वर्चस्वाला धक्का देऊ शेकतील ही भीती गांधीवादी कॉंग्रेसवाल्याना वाटत होती. त्यामुळे कॉंग्रेस कमिटीने त्यांच्यावर खोटे आरोप करून बदनामी करून त्याना निवडणूकीस अपात्र ठरवण्यासाठी महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीने मागे पुढे पाहिले नाही. गांधीवादी तर कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. त्याना दूर ठेवून निवडणूक लढवणे शक्य नव्हते. महाराष्ट्रातील गांधीवाद्याचे विश्वासू नेते म्हणून शंकरराव देवचे नाव घेतले जात होते. ते कॉंग्रेसच्या सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाचे सभासद होते. तसेच ते अखील भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीचे सभासद होते. त्यामुळे भारतीय कॉंग्रेस श्रेष्ठीमध्ये शंकररावांना फार महत्व होते. त्यामुळे शंकररावानी आपल्या वजनांचा उपयोग करून जास्तीत जास्त तिकीटे गांधीवाद्यांना देण्याचा प्रयत्न केला. आणि कांही भागात इतर गटाचे प्राबल्य बघून इतर गटांनाही तिकीट देणे भाग पडले.

1946 च्या सार्वत्रिक निवडणूकीचे रणशींग फुंकले गेले व त्याचे पडसाद सोलापूर जिल्हयातही उमटले. गटातटांच्या राजकारणाला सुरूवात झाली. अशा परिस्थितीत कॉंग्रेस पक्षाचे तिकिट आपल्याला मिळावे यासाठी अनेक कार्यकर्ते धडपड करू लागले. परंतु तुळशीदासांनी जनतेसाठी केलेले कार्य त्यांचा ग्रामीण जनतेशी असलेला संपर्क हे लोकांच्या हृत्यात स्थान करून होते. तुळशीदासांना जनतेच्या भावना, जनतेच्या अडीअडचणी, जनतेचे सुख कशात आहे या सर्वाची जाणीव तुळशीदासांना होती. तुळशीदास कॉंग्रेसचे पाईक होते. सामान्य जनतेचे ते आधारस्तंभ होते. दुष्काळाच्या काळात जनतेसाठी केलेले कार्य जनता विसरू शकत नव्हती. त्यामुळे कॉंग्रेस पक्षाचे तिकीट त्याना देण्याशिवाय कॉंग्रेसपुढे पर्याय नव्हता. आणि त्यांच्यात आपल्या बरोबर इतर उमेदवारानाही निवडून आणण्याचे सामर्थ्य होते. त्याचप्रमाणे

सोलापूर, बार्शी, माढा व करमाळा अशा चार मतदार संघातील दोन जागासाठी श्री. तुळशीदासजी जाधव व सिद्रामप्पा बसप्पा धुम्मा यांची आणि हरजिन जागेसाठी सातारा जिल्हयातील हरिजन कार्यकर्ते श्री. लक्ष्मण बाबाजी भिंगारदीवे यांची निवड केली व त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून हिंदुमहासभेचे बाबुराव काळे, विठ्ठल तुकाराम कुलकर्णी व गणपत एकनाथ पाटील हे होते. निवडणुकीची सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन तुळशीदासांनी सर्व खेडी पिंजून काढली. त्यानी आपल्या प्रचार सभेत अगोदर धुम्मा व भिंगारदिवे यांना मतदान करा व नंतर मला मतदान करा असे सांगत होते.[10] अशाप्रकारे निवडणूकीत कॉंग्रेसचे तिन्ही उमेदवार निवडून आले. श्री. धुम्मा यांना 19380 मते मिळाली. श्री. तुळशीदास जाधव यांना 16,705 मते आणि श्री. भिंगारदिवे यांना 18,264 मते मिळाली.[11]

निवडणूकीत विजयी झाल्यानंतर त्यानी आपल्या विजयाचे श्रेय आपले सहकारी श्री. अंत्रोळीकर भाई, छन्नुसिंग, श्री. रामकृष्णजी जाजु इत्यादिंना दिले. विजयी झाल्यानंतर ठिकठिकाणी त्यांचे सत्काराचे कार्यक्रम ठेवले जात होते. अशाच एका सत्काराला जात असताना सोलापूरच्या सम्राट चौकातील शंभर झोपडया जळल्याची बातमी त्यांना समजली. हे समजताच ते सत्काराला न जाता आगीमुळे निराधार झालेल्या संकटग्रस्थांकडे गेले व त्यांनी त्यांना व्यापा–याकडून मदत घेऊन धोतर, लुगडी , सदरे भांडीकुंडी दिली व त्यांना घरे बांधून देऊन उद्वस्त झालेले जीवन सुरळीत करून दिले. यावरून तुळशीदासांचे सर्वसामान्य जनतेवर किती लक्ष होते व ते सत्काराऐवजी सत्कार्याला महत्व देणारे नेते होते हे स्पष्ट होते.

1946 च्या मार्च महिन्यात मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणूका पार पडल्या. यामध्ये शंकरराव देव, देवगीरीकर, सोमन वगैरे पार्लमेंटरी बोर्डाच्या सदस्यांनी आपल्या गटातील लोकांना जास्तीत जास्त तिकीटे मिळवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी गाडगीळ व जेथे यानी सुचवलेल्या लोकांना तिकीटे देण्यास विरोध केला होता. कायदेमंडळाच्या 175 जागा पैकी 128 जिंकून कॉग्रेसने घवघवीत यश मिळवले होते. मुस्लीम लिगला 30 जागा मिळाल्या. कॉग्रेसपक्षाने बाळासाहेब खेर यांची मुख्यमंत्री म्हणून पुन्हा निवड केली. मंत्रीमंडळ तयार करताना गाडगीळ जेथे, जाधव इ. कोणत्याही नेत्याना बाळासाहेबांनी विश्वासात घेतले नाही. याचवेळी चाळीस आमदांरांची बैठक भाऊसाहेब राऊत यांच्या घरी झाली. त्यात त्यांनी कांही जनांची मंत्रीमंडळात समावेशाबाबत शिफारस करण्याचे ठरवले. बाबासाहेब शिंदे भाऊसाहेब राऊत आणि तुळशीदास जाधव या तिघांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री खेर व शंकरराव देव यांची भेट घेतली. परंतु त्यांनी केलेल्या शिफारशीचा कांहीही उपयोग झाला नाही.[12] यावेळी केशवराव जेध्ये भाऊसाहेब राऊत, तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे इ. नेत्यानी बहुजनसमाजातील नेत्यांना मुंबई मंत्रीमंडळात पुरेशे नेतृत्व मिळाले नाही म्हणून कॉग्रेसच्या निवडणूका लढवून पक्षसंघटना काबीज करण्याचे ठरवले. प्रांताध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी समाजवादी गटातर्फे रावसाहेब पटवर्धन गांधीवादी गटातर्फे शंकरराव देव आणि केशवराव जेधे हे उमेदवार होते. 1946 च्या मे महिन्यात केशवराव जेधे हे पुन्हा प्रांतीक अध्यक्ष झाले.[13]

शेतकरी कामगार पक्षाची स्थापना –

केशवराव जेधे प्रांतीक कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. तसेच ते कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघाचेही प्रवक्ते होते. 'चलेजाव' चळवळीत केशवराव तुरूंगात असताना इंग्रज सरकारने कॉंग्रेसला बेकायदेशीर संघटना ठरवल्याने आक्टोबर, 1944 मध्ये महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयात महाराष्ट्र विधायक समितीचे "शेतकरी कामगार संघा" मध्ये रूपांतर करण्यात आले होते. 11 सप्टेंबर, 1946 रोजी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन करण्याचा ठराव मंजूर झाला. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, भाऊसाहेब राऊत, रा.भ. नलावडे, यशवंतराव चव्हाण वगैरे कॉंग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी या संघाच्या स्थापण्यास फार मोठया प्रमाणात हातभार लावला होता. 11 जानेवारी, 1947 रोजी भाऊसाहेब राऊत यांच्या घरी बैठक झाली तेव्हा या मंडळीबरोबर र.के. खाडीलकर, आचार्य प्र.के. अत्रे, सोनुसिंग पाटील इत्यादि नेतेमंडळी हजर होती. यावेळी जेधे, अत्रे, खाडीलकर, मोरे, जाधव इत्यादींनी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी कामकरी पक्ष संघटीत करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. तर यशवंतराव चव्हाण व सोनुसिंग पाटील यांनी या गोष्टीला विरोध केला. केशवराव जेध्यांनी आपल्या भाषणात खेर मंत्रीमंडळाचे धोरण शेतक–यांचे हित जोपासणारे नाही असे जनतेला सांगत होते. अशा प्रकारे खेर व जेधे यांच्यात दुरावा निर्माण होत गेला.[14] बहुजन समाजाच्या पुढा–यांची कुचंबना होत होती. तेव्हा कॉंग्रेस अंतर्गत पक्ष व संघ स्थापन करावा अशी मुळ कल्पना तुळशीदास जाधव यांनी जेधे, मोरे, गाडगीळ इत्यादी नेत्यापुढे मांडली. महाराष्ट्रात महात्मा गांधींच्या आचार विचार खेडयातील लोकांना पटवून प्रामाणिक व श्रमजीवी पुढा–यांची निर्मिती झाली पाहिजे. तसेच पुढे

मिळणा–या स्वराज्याचा आर्थिक, सामाजिक व राजकीय कल्पना खेडयातील लोकांना मिळवून देता आला पाहिजे हा म. गांधींचा व सर्व धर्म चालकांचा उद्‌देश सफल करावयाचा असेल तर महाराष्ट्रातील पुढारीपणाचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे व तेही शेतक–यामधील पुढा–यांच्या हाती दिले पाहिजे अशी कल्पना तुळशीदास जाधव यांनी मांडली.

तुळशीदासांनी मांडलेल्या कल्पनेवर विचार विनिमय करण्यासाठी पुण्यामध्ये भाऊसाहेब राऊत यांच्या निवासस्थानी बैठका झाल्या. त्यांच्या विचाराशी सहमत असलेल्यापैकी बाळासाहेब सावंत, भाऊसाहेब महागावकर, ज्ञानोबा जाधव, ज्ञानोबा भोंगले, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, काकासाहेब वाघ, नाना पाटील, दत्ता देशमुख, व्ही.एन्. पाटील, केशवराव जेधे, भाई सथ्था इ. अनेक नेत्यांच्या विचाराने श्री. तुळशीदास जाधव, नाना पाटील व काकासाहेब वाघ यांनी महाराष्ट्रात दौरे काढून हजारो सभा घेऊन कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ स्थापन करण्याची आवश्यकता पटवून देऊन सारा महाराष्ट्र हालवून सोडला. 15

तुळशीदास जाधव, नाना पाटील व काकासाहेब वाघ इत्यादीनी महाराष्ट्रभर दौरा करून शेतकरी संघटना शेतक–यांच्या हितासाठी कशी आवश्यक आहे हे पटवून दिले. त्यांची ही विचारधारा सर्व सामान्य जनतेपर्यंत जाऊन रूजू लागली होती. तेव्हा आपली सत्ता आणि आपले स्थान यांना धोका निर्माण होईल अशी भिती शंकरराव देव–देवगीरीकर हया कॉंग्रेसमधील गटाला वाटू लागली. आज ना उद्या ही अंतर्गत संघटना आपल्या स्थानाला धक्का देईल या विकल्याने पछाडलेल्या या गटाने श्री. तुळशीदास जाधव केशवराव जेधे, शंकरराव मोरे या मंडळीवर आक्षेप ठेऊन नव्या संघटनेस प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे दौरे बंद केले. एवढेच नव्हे तर श्री.

शंकरराव मोरे, बाबासाहेब घोरपडे यांच्याविरूध्द कारस्थाने रचून भावी असेंब्ली निवडणूकीची तिकीटे मिळू नयेत म्हणून प्रयत्न केले. तेव्हा श्री. तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे इत्यादी नेत्यांनी ठिकठिकाणी बैठका घेऊन चर्चा करून बहुजन समाजातील पुढारी निर्माण करण्यासाठी सर्व पुढा–यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. हया सर्व उठावाचा परिणाम त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या मनावर फार झाला. त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या असेंब्लीत असे सांगितले की, कॉंग्रेस अंतर्गत बंड करणा–या नेत्यांचे सुत्रधार हे श्री. तुळशीदास जाधव हे आहेत.[16]

24 व 25 एप्रिलला मुंबईमध्ये अखिल भारतीय कॉंग्रेसची बैठक झाली. कॉंग्रेसमध्ये स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेले उपपक्ष किंवा गट असू नयेत अशा अर्थाची घटना दुरूस्ती मंजूर करण्यात आ ली. 26 तारखेस कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी कामकरी संघाच्या नेत्यांची बैठक झाली आणि जेधे, मोरे, जाधव, राऊत, नलावडे, भापकर वगैरेनी 31 मे पर्यंत कॉंग्रेस सदस्य त्यांचे राजीनामे द्यावेत असे ठरले. तेव्हा जेधे व मोरे यांनी वृत्तपत्रामध्ये मुलाखती देऊन असे जाहीर केले की, "आमच्या राजीनाम्याने महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षाला गळती लागल्याशिवाय रहाणार नाही.[17]

तेव्हा मोरे व जेधे यानी असे जाहीर केले की, आमचा पक्ष समाजवादी पक्षात सामील होणार नाही. परंतु त्या पक्षाला आमचा पक्ष सहकार्य करेल. केशवराव जेधे व मोरे यांनी उत्तर सातारचा दौरा केला त्यावेळी जेधे–मोरे यांनी सोलापूर जिल्हयाचाही दौरा केला. सर्व नेतेमंडळींची कॉंग्रेसवर नितांत निष्ठा असताना कॉंग्रेस अंतर्गत मतभेदामुळे कॉंग्रेसवर निष्ठा असणारी कॉंग्रेसची शक्ती असलेली, कॉंग्रेसची ताकद वाढवणारी आणि कॉंग्रेसला झोपडपट्टीपर्यंत पोहचवणारी ही

मंडळी बेचैन झाली व त्यांनी कॉंग्रेसच्या वरील पक्षपाती धोरणाच्या ठरावावर विचार विनिमय करून कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून स्वतंत्र असा "शेतकरी कामगार पक्ष" स्थापण्याचा निर्णय घेतला व दि 26 एप्रिल, 1948 हया ऐतिहासिक दिवशी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघटना अस्तित्वात असेपर्यंत श्री. बाबासाहेब घोरपडे, माधवराव मेमाणे, क्रांतीसिंह नाना पाटील, बाळासाहेब उर्फ पी.के. सावंत, प्रभुती मंडळी शेतकरी कामगार पक्ष स्थापनेच्या प्रारंभी अनुकूल होती. परंतु कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून शेतकरी कामगार पक्षात येण्यास ही मंडळी तयार नव्हती. श्री. केशवराव जेधे हे सुध्दा पक्ष स्थापन झाल्यानंतर पक्षात सामील झाले. [18]

सोलापूर जिल्हयाचा दौरा आटोपून केशवराव जेधे बेळगावला गेले. बेळगावच्या सभेत ते म्हणाले, "श्री. शंकरराव देव हे मला कॉंग्रेसमध्ये राहण्याचा फार आग्रह करत आहेत. मी कॉंग्रेस सोडण्याचे मनात ही आणणार नाही, पण यापूर्वी कॉंग्रेस पक्षाने नव्या पक्षास मान्यता दिली पाहिजे आणि श्री. नाना पाटील व इतर जे कॉंगेस सोडून जात आहेत त्यांना सन्मानपूर्वक कॉंग्रेसमध्ये परत बोलावण्यात आले पाहिजे. अशी घोषणा केली होती. [19] परंतु केशवरावांच्या या अटी कॉंग्रेस नेत्यांना स्वीकारणे शक्य नव्हते. 27 मे रोजी पुण्यात रोकडोबाचे देवळात झालेल्या सभेत केशवरावानी आपण कॉंग्रेस पक्ष सोडणार असल्याची घोषणा केली. [20] नवा पक्ष स्थापन करण्याचे ठरवून जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, भाऊसाहेब राऊत, खाडीलकर, दत्ता देशमुख इत्यादींनी कॉंग्रेस पक्ष सोडला.

शेतकरी कामगार पक्षाचे तत्वज्ञान व ताकद समाजात जाऊन समाजशी एकरूप होऊन आपले तत्वज्ञान, हेतु, ध्येय सांगितल्याशिवाय पक्षाचे सामर्थ्य वाढणार नाही हे देऊन

महाराष्ट्रातीलच नव्हे तर व–हाड, विदर्भ भागातील जनतेचा पाठींबा मिळवण्यासाठी पक्षाचे बळ वाढवण्यासाठी आणि ठिकठिकाणी पक्षाच्या शाखा उभारण्यासाठी श्री. तुळशीदासजींनी महाराष्ट् खानदेश, व–हाड विदर्भ भागात दौरा काढून प्रत्येक प्रमुख शहरात कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेऊन बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून तरूण कार्यकर्त्यांना पक्षात ओढण्याचा प्रयत्न केला, त्यात त्यांना यशही आले. त्यानी स्वतंत्र पक्ष स्थापण्याची आवश्यकता याचे विश्लेशन करून जनतेचाही पाठींबा मिळविण्यासाठी तुळशीदासांनी शेकडो जाहीरसभाही घेतल्या. व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न केला.

कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून सातारचे क्रांतीसिंह नाना पाटील हे पक्षात येण्यास तयार नव्हते. त्यांना तुळशीदासांनी आपल्यात आणण्याचा खूंप प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. तेंव्हा तुळशीदास बेचैन झाले, नानासारखा प्रभावी नेता आपल्या पक्षास मिळाल्यास आपल्या पक्षाला फार मोठा आधार होईल तेव्हा त्यांच्या मनात एक विचार आला. नाना कुणाचेही एकणार नाहीत, तेव्हा त्यांच्या मनात भाऊराव पाटलांची आठवण आली आणि कोणत्याही परिस्थितीत कर्मविरांचे मन नाना दुखावणार नाहीत याची त्यांना खात्री वाटत होती श्री. शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत यांना बरोबर घेऊन तुळशीदासजी सातारला कर्मवीरांकडे घेऊन गेले. तुळशीदासांनी कर्मवीरांना नानांची किती आवश्यकता आहे हे पटवून सांगितले. कर्मविरांनी नानांना लगेच बोलावणे पाठवले. नाना आल्यानंतर कर्मवीरांनी सर्व हकिगत सांगितली. तेव्हा नानानी धीर धरून काकुळतीने भाऊरावांना सांगितले. अण्णा मला नका या फंद्यात पाडू. माझे नुकसान करू नका. शेतकरी कामगार पक्षात गेलो तर शेपूट तुटलेल्या कोल्यासारखी माझी

अवस्था होईल. परंतु कर्मवीरांनी अधिक जोर केल्यावर नाना पाटील शेतकरी कामगार पक्षात येण्यास तयार झाले. तेव्हा तुळशीदासांना व इतर सहकार्यांना एक चांगला पुढारी मिळाला.[21]

13 जुलै, 1948 रोजी महाराष्ट् प्रांतीक कॉंग्रेसच्या नव्या चिटणीसांनी पक्ष सोडून गेलेले सभासद कॉंग्रेसच्या तिकीटावर निवडून आलेले असल्याने त्यांनी घटना समितीचे तसेच कायदेमंडळाचे सभासदत्वही सोडून द्यावे असे पत्र पाठवून त्यांना सूचवले. या पत्राचे उत्तर 16 ऑगस्टला कॉंग्रेसचे अध्यक्ष बाबू राजेंद्र प्रसाद यांच्याकडे पाठवण्यात आले. या पत्राची राजेंद्र बाबूनी फक्त पोच दिली. परंतु पत्राचे उत्तर पाठवले नाही. हयाच आशयाचे पत्र अखिल भारतीय कॉंग्रेसचे सरचिटणीस श्री. शंकरराव देव यांनाही पाठवले. या महाराष्ट्र प्रांतीक कॉंग्रेस कमिटीला अशा प्रकारचे व घटनापरिषदेच्या सभासदत्वाचे राजीनामे मागता येतात काय ? असा प्रश्न त्यावेळचे पक्षाचे सेक्रेटरी शंकरराव मोरे यांनी राष्ट्रापती राजेंद्र बाबू, अखिल भारतीय कॉंग्रेसचे सरचिटणीस शंकरराव देव व मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना पाठवली. तेव्हा कोणाच्याही पत्राचे उत्तर येत नाही हे पाहून शंकरराव मोरे यांनी शेतकरी कामगार पक्षाचे सेक्रेटरी या नात्याने एक पत्रक काढून हया वादाचा राष्ट्राध्यक्षाकडून निर्णय लागेपर्यंत पक्षाच्या कोणत्याही सदस्यांने आमदारकीचा अथवा घटना परिषदेचा राजिनामा देऊ नये असे जाहीर केले.[22] त्यांनी राजीनामे न देता पूर्वीसारखेच काम सुरू ठेवले. त्यावर त्यांच्यावर शेतकरी कामगार पक्ष सत्ताभिलाबी आहे, त्यांना सत्ता सोडवत नाही अशी टीका करण्यात येऊ लागली. त्यांना बदनाम करण्याचाही प्रयत्न केला जाऊ लागला. परंतु हे सर्व प्रयत्न कॉंग्रेसवाल्यांचे निष्फळ ठरले. शेतकरी कामगार पक्ष स्थापन झाल्यानंतर कोल्हापूरचे माधवराव बागल, काकासाहेब वाघ, दाजीबा देसाई वगैरे मंडळी शेतकरी कामगार पक्षात सामील झाली.

शेतकरी कामगार पक्ष स्थापन्यास सर्व मंडळींनी जिद्दीने प्रयत्न केले. पण सर्वापेक्षाही शेतकरी कामगार पक्ष स्थापन्यापासून ते त्या पक्षाला स्थैर्य प्राप्त करून देण्यापर्यंत सर्व श्रेय तुळशीदासांना दिले तर ते वावगे ठरणार नाही. पण पक्ष स्थापन्याच्या आधी शंकरराव देव यांच्याशी चर्चा करून त्यांना अंतर्गत कलहाविषयी समजवण्याचा प्रयत्न ही तुळशीदासांनी केला.

शेतकरी कामगार पक्षाचे पहिले अधिवेशन –

5 व 6 सप्टेंबर, 1948 रोजी शेतकरी कामगार पक्षाचे पहिले अधिवेशन सोलापूरला घेण्यात आले. सोलापूर जिल्हयात श्री. तुळशीदास जाधव यांनी अनेक वर्ष चिवटपणाने काम केले होते. कार्यकर्त्यांचा संच जमा केला होता, श्री. माधवराव थीटे, प्रभाकर कटके, विश्वासराव फाटे वगैरे तरून कार्यकर्ते जिद्दीने काम करत होते. सोलापुरातील गिरणी कामगारांच्या चळवळीत तुळशीदासांचा सहभाग होता. त्यामुळे तेथेही तुळशीदासांचे चांगले वजन होते आणि त्यानी शेतकरी कामगार पक्षाच्या उभारणीसाठी केलेले योगदान हे सोलापूरला पहिले अधिवेशन भरवण्यासाठी सर्व पोषक परिस्थिती निर्माण केलेली होती.[23] हे अधिवेशन सोलापूर येथील जुन्या गिरणीजवळ पोलीस लाईनच्या पटांगणात घेण्यात आले. शेतकरी कामगार पक्षाच्या या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पुण्याचे शंकरराव मोरे यांची निवड करण्यात आली. स्वागताध्यक्ष हे तुळशीदास जाधव हे होते. या शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजातील कार्यकर्त्यात आणि पुढा–यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला अनेक पुढारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तेव्हा तुळशीदासांनी स्वागताध्यक्षपदी आपले भाषण करताना त्यांनी "शेतकरी कामगार पक्ष स्थापन करण्याची जरूरी का भासली आणि महाराष्ट्

कॉंग्रेस श्रेष्ठीचे बहुजन समाज आणि शेतकरी वर्ग यांच्यासंबंधीचे धोरण आणि पक्षाच्या स्थापनेच्या संदर्भात झालेला संघर्ष इत्यादी विषयी माहिती त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितली." पुढे ते आपल्या भाषणात म्हणाले, "आपण देशाचे स्वातंत्र्य जिद्दीने प्रयत्नाने मिळवले, आपले राज्य आले तरीपण आपले जिवीत टाटा, बिर्ला, भाभा, दालमीया यांच्यासारख्या भांडवलदारांच्या हातात आहे. येथील सत्ता पिढयानपिढया चालत आलेल्या जुण्यापुराण्या विचारांच्या पुढा–यांच्या हातात आहे. ही सत्ता नवीन विचारांच्या युवकांच्या हातात आली पाहिजे. म्हणून आम्ही हा संघर्ष केला आहे आणि शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली आणि त्यांनी येथून पुढील सर्व जबाबदारी सर्व कार्यकर्त्यांची आहे. त्यानी आपला पक्ष वाढवण्यासाठी कामगार संघटीत करा, शेतकरी संघटीत करा असे आव्हान कार्यकर्त्यांना आपल्या स्वागतपर भाषणात केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शैलीदार भाषणात असे म्हटले की, श्री. शंकरराव मोरे यांनी पक्ष उभारण्यासाठी जे अमाप परिश्रम घेतले ते कोणालाही अमान्य करता येणार नाही. त्यांना शेतकरी कामगाराबद्दल असणारी कळकळ त्यांच्या तळमळीतून दिसून येते असा कार्यकर्ता शेतकरी कामगार पक्षास मिळाल्याने पक्षाचा हा वटवृक्ष फोफावल्याशिवाय रहाणार नाही. खेडयापाडयातून नेतृत्व निर्माण करण्यासाठी शंकरराव मोरे यांच्यासारख्या मार्गदर्शकाचीच आवश्यकता आहे.

श्री. शंकरराव मोरे हे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "समाज उन्नतीची धारणा घेऊन समाजामध्ये विशेषतः बहुजन समाजामध्ये इतिहास घडविण्याच्या इर्शेने उभ्या राहिलेल्या हया पक्षाच्या इतिहासात हा एक ऐतिहासिक क्षण आहे. आम्ही कॉंग्रेसमधून बाहेर का पडलो त्याचे

महत्वाचे कारण असे आहे की, म. गांधी, म. फुले, राजर्षि शाहू यांची ध्येय कॉंग्रेस पक्ष साकार करू शकणार नाही अशी आमची खात्री पटल्यानंतर आम्ही बाहेर पडलो. बहुजन समाजाकरिता स्वातंत्र्य मिळवूनही आम्ही कांही करू शकत नाही ही मनातील खंत आम्हाला स्वस्थ बसू देईना. म्हणूनच आम्हाला संघर्ष करावा लागला. पण तो करताना सुध्दा आम्ही शंकरराव देव प्रभुतींना समजूत घालण्याचा अगदी टोकापर्यंत जाऊन प्रयत्न केला. विशेषतः आजच्या सभेचे स्वागताध्यक्ष श्री. तुळशीदास जाधव यांनी संघर्ष टाळण्याचा अटोकाट प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. बहुजन समाजातील पुढा–यांना सुध्दा योग्य रितीने वागवले जात नाही. मग बहुजन समाजाबद्दल हे काय करणार ? समाजातील आर्थिक विषमता नष्ट करून जोपर्यंत समानता आणली जात नाही तो पर्यंत बहुजन समाजाचे खरे कल्यान होणार नाही व ते करण्याची चिन्हे कॉंग्रेसमध्ये आज तरी दिसत नाहीत. म्हणून बहुजन समाजाचे हित करणारा नवा पक्ष आम्हाला स्थापन करावा लागला. हा पक्ष स्थापन करताना आमचा कोणताही स्वार्थ नाही, कोणतीही अभिलाषा नाही, केवळ बहुजन समाजाच्या हिताकडे मध्यम वर्गीय कॉंग्रेस पुढा–यांकडून होत असलेले दुर्लक्ष हेच या पक्षाच्या स्थापनेला मुलभूत कारण आहे. पण ध्येय साध्य करताना आम्हाला पराकाष्टेने श्रम करावे लागणार आहेत. त्यांनी शेतक–यांकडून जगाचे जीवन समृध्द झालेले आहे तोच जगाचा खरा पालनवाला आहे असे सांगून त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण संपवले.[24] पक्षाच्या वटवृक्षाचे रोपटे लावून कष्टाचे खत आणि चिकाटीचे पाणी घालून ते वाढविण्याच्या बाबतीत सर्वात मोठा वाटा जर कोणाचा असेल तर तो तुळशीदास जाधव यांचा आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्रात आम्हाला सत्तेचा वाटा द्या अन्यथ आम्ही तुमचे प्रभुत्व मोडून काढू अशा सततच्या डरकाळयातून सत्तेत शिरावयाचे बळ तयार करण्याचा आराखडा शेतकरी कामगार पक्ष बनला. महाराष्ट्रातील लोकशाही सत्तेला बहुजन समाजातील नेतृत्व पुरवणारा राजकीय आराखडा शेतकरी कामगार पक्ष ठरला. त्या आराखडयाची जोपासना करणारे जे जुन्या पिढीतील बहुजन समाजाचा कळवळ असणारी व्यक्तीमत्वे होती त्यात तुळशीदासांना सत्तेच्या सिंहासनाचा दरवाजा 1947 पासूनच किलकीला करून घेणेची संधी निर्माण झाली. 1948 मध्ये म. गांधींचा खून झाला. ब्राह्मणी वर्चस्वाविरूध्द एक प्रचंड लाट निर्माण झाली.

दाभाडी अधिवेशन –

शेतकरी कामगार पक्षात तीन प्रकारची कार्यशक्ती एकत्र आली. तसेच एक चमत्कारीक घटनाही घडली. शेतकरी कामगार पक्षात बहुजन समाजाचा सामाजिक पाया संघर्षाच्या राजकारणातून वर आलेला कार्यशक्ती या पक्षात समाविष्ठ झाल्या. आणि जगातील 1/3 भागावर समाजवादाच्या राजकारणाची सत्ता आली. स्वातंत्र्य लढयानाच समाजवादाचा आशय येत गेला. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षात वर्ग लढे वर्ग क्रांती आणि समाजवाद यांच्या विचारांची लाट आली. ब्राह्मणेतर पक्षातून सत्ताधारी घेणे एवढेच राजकीय उद्दिष्ट ज्यांचे अंतरी होते ते ही शेतकरी कामगार पक्षात आले. शेतकरी कामगार पक्षाने 1950 साली दाभाडी (जि. नाशिक) येथे झालेल्या अधिवेशनात मार्क्स लेनिन – स्टॅलीन माओ वादाचा स्वीकार केला. संघटनावर्ग, संघर्ष वर्ग, क्रांतीतून समाजवाद स्थापन करण्याचे राजकारण स्वीकारले. त्यात तुळशीदास जाधव हे होते. जेधे, मोरे, काकासाहेब वाघ, भाऊसाहेब राऊत, नारायणराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, र.के.

खाडीलकर आदि नेते अधिवेशनाला उपस्थित होते. मराठा आणि तत् सभातून सुशिक्षितांचा भरणा अधिक होता आणि सातारच्या प्रतिसत्तेच्या लढयापासून सशस्त्र रक्षककार निजामाविरूध्द लढयातून जमा झालेले आम्हासारखे स्वतंत्र सैनिकही होते. शेतकरी कामगार शेतमजूर, युवकांच्या संघटना उभे करण्याचे काम मोठया जोमाने शेतकरी कामगार पक्षाने हाती घेतले.[25]

शेतकरी कामगार पक्षाचे दुसरे अधिवेशन 29 मे, 1950 रोजी नाशिक जिल्हयातील मालेगाव जवळील दाभाडी गावी भरले होते. केशवराव जेधे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणाचा जवळ–जवळ सगळा भाग महाराष्ट्र कॉंग्रेसमधून गटबाजीला व सत्तेच्या राजकारणाला कंटाळून आपण शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. दाभाडी अधिवेशनामध्ये अमेरिका इंग्लंड सारख्या साम्राज्यवादी राष्ट्रांच्या गटात सामील झालेल्या नेहरू सरकारविरूध्द जनतेची लोकशाही आघाडी उभारल्यावर भर दिला होता. भारताने रशिया, चीन वगैरे समाजवादी राष्ट्रांच्या गटात सामील व्हावे असेही केशवरावानी म्हटले होते. मार्क्सवादावरील मुलभूत ग्रंथांचा अभ्यास करण्यावर तसेच कॉमीन्पफॉर्म या जागतिक कम्युनिष्ट संघटनेचे मार्गदर्शन घेण्याच्या आवश्यकतेवर दाभाडी अधिवेशनात भर दिला होता.[26]

शेतकरी कामगार पक्षाने दाभाडी प्रबंधामध्ये स्वीकारले की कसणा–यांची जमीन, राबणा–यांचा कारखाना, प्रत्येकाला काम, कामाचा निर्वाह योग्य दाम इ. बाबतीत ही ठराव करण्यात आले होते.[27]

वाठारचे अधिवेशन –

शेतकरी कामगार पक्षाचे अधिवेशन सातारा जिल्हयातील वाठार या खेडेगावी दि. 8, 9 व 10 सप्टेंबर, 1950 रोजी तीन दिवस भरले होते. वाठारसारख्या खेडेगावी हे अधिवेशन घेण्याचे कारण म्हणजे शेतकरी कामगार पक्ष हा ख–या अर्थाने समजीवी अशा शेतकरी कामगारांचा पक्ष असून तेथील जनतेची कामगारांचे खरे स्वतंत्र आणण्याची तळमळ आहे. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून तुळशीदास जाधव यांची निवड करण्यात आली होती. या अधिवेशनासाठी अखिल महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सोलापूर, उत्तर व दक्षिण सातारा, बेळगाव, रत्नागिरी, नाशिक, ठाणे, अहमदनगर इत्यादी अनेक ठिकाणचे प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित होते.

वाठार गावच्या वेशीपासून ते थेट अध्यक्षांच्या निवासस्थानापर्यंत शृंगारलेल्या साठ बैलांच्या रथातून नियोजित अध्यक्ष तुळशीदासजी जाधव, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, इत्यादी नेते मंडळी मिरवणूकीमध्ये सहभागी होती. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या वाडयात दुपारी 2 वाजता खुल्या अधिवेशनाला सुरूवात झाली. यावेळी श्री. केशवराव पवार हे स्वागताध्यक्ष होते. त्यांचे छोटेसे भाषण केले.

तुळशीदास जाधव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणाला सुरूवात केली. तुळशीदास भाषणास उठल्यानंतर प्रचंड टाळया व जयजयकार यांने सर्व वातावरण दणाणून गेले. तुळशीदासांनी प्रथम आपल्याला हा बहुमान दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. हा बहुमान माझा एकटयाचा नसून सर्व पक्ष कार्यकर्त्यांचा आहे असे मी मानतो. कार्यकर्तेच पुढारी निर्माण करत

असतात. अस्सल शेतकरी कामगारी वर्गाचे पुढारी त्या त्या वर्गातून आपल्याला निर्माण करावयाचे आहेत. असे त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.[28]

रयत शिक्षण संस्थेची बंद केलेली ग्रॅन्ड चालू करून दिली –

महात्मा गांधींच्या खूनानंतर महाराष्ट्रामध्ये दंगली पेटल्या होत्या. त्यावेळी बाळासाहेब खेर पुण्याच्या शनिवार वाडयासमोर जाहीर सभेत म्हणाले, ''ब्राह्मणावर अत्याचार होत आहेत, पण मी गुंडाना सांगू इच्छितो की जोपर्यंत माझ्या अंगात रक्ताचा शेवटचा थेंब आहे तो पर्यंत मी ब्राह्मणांचे संरक्षण करेल'' त्या भाषणाचा वृत्तांत दुस–या दिवशीच्या 'ज्ञानप्रकाश' यामध्ये छापून आला. तो वाचून कर्मवीर आण्णा भडकले. सातारच्या जाहीर सभेत भाषण करत असताना आण्णा म्हणाले, ''बाळासाहेब खेर म्हणतात, माझ्या अंगात शेवटचा थेंब असेपर्यंत मी ब्राह्मणांचे रक्षण करेन. तेव्हा ब्राह्मणांचे खेर रक्षण करणारा बहुजन समाज आहे. पाटण येथे भटांची घरे जाळण्यास जमाव आला असता एक शूर फौजदार श्री. माने यांची त्याला विरोध केला. संतप्त लोकांनी त्यालाच ठार केले. मानेने आत्मबलिदान करून ब्राह्मणांची घरे वाचवली म्हणून मी खेरांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील ब्राह्मणांचे संरक्षण बहुजन समाजच करू शकेल. आणि तुम्ही ते करू शकणार नाही. आणि तुमच्या अंगात असून असून किती रक्त असेल ? दिड दोन लिटर ! त्याने किती ब्राह्मणांचे रक्षण करणार ? त्यामुळे स्थानिक ब्राह्मणांना कर्मवीरांचे कार्यपसंत नव्हते. त्यांची संस्था त्यांना डोचत होती. कारण त्या संस्थेमधून बहुजन समाजाची मुले–मुली शिकून बाहेर पडत होती. तेव्हा स्थानिक ब्राह्मणानी मोरारजी देसाई व बाळासाहेब खेर यांच्याकडे अशी तक्रार केली की भाऊरावानी जातीयवादाला प्रोस्ताहन देणारे भाषण केले आहे.

त्यानी खेराच्या अंगातील रक्त काढू व त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकार्याचा खून करण्याचा कट आखला आहे. अशी तक्रार केली तेव्हा खेर सरकारने रयत शिक्षण संस्थेची दीड लाख रूपये वार्षिक ग्रॅन्ड बंद केली. आण्णावर भाषण बंदी लादली. कर्मवीरांच्या घराची तसेचइतर आजीव सेवकांच्या घराची झडती घेण्यात आली.

हा प्रकार घडला तेव्हा श्री. तुळशीदास जाधव हे मुंबई असेंबलीचे सभासद होते. श्री. बापुसाहेब भापकर, रा.ज. नलावडे, दत्ता देशमुख, भाऊसाहेब राऊत इत्यादी विरोधी सदस्य होते. दादांनी त्या काळात स्वतः सातारला येऊन कर्मवीरांशी व इतर कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून खूप माहिती गोळा केली व त्या आधारे खेर–मोरारजीवर असेंबलीत प्रश्नाचा भडीमार करून सोडले होते. या सर्व रेटयाचा परिणाम म्हणून की काय मुरारजी सरकारला नमावे लागले व रयत शिक्षण संस्थेची ग्रॅट 30 जानेवारी, 1949 रोजी पुन्हा सुरू करत असल्याचे शासनाने जाहीर केले. अशा प्रकारे तुळशीदासानी मुंबई असेंबलीमध्ये असताना आपल्या कर्तृत्वाने अनेक कार्ये पार पाडली.[29]

यशवंतराव चव्हाण आणि तुळशीदास जाधव यांची प्रथम भेट येरवडा कॅप जेलमध्ये झाली. यशवंतरावाना तुळशीदासाविषयी फार आपुलकी वाटत होती. ते म्हणतात, "शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेच्या वेळी तुळशीदास शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेतील एक आग्रगन्य नेते होते. आणि त्यानी आपल्या पक्षाचा प्रचार धुमधडाक्याने सुरू केला होता. तुळशीदास हे जबरदस्त प्रचारक आहेत. लोकांना समजणा–या भाषेत तासनतास ते बोलू शकतात, महाराष्ट्रात त्यावेळी

श्री. काकासाहेब वाघ श्री. केशवराव जेधे, श्री. शंकरराव मोरे, श्री. नाना पाटील अशी मातब्बर नेते मंडळी शेतकरी कामगार पक्षाच्या मागे उभी होती. [30]

प्रकरण दुसरे

संदर्भ सूची

1. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 66 – संपादक – राम बी. साळुंखे.

2. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 39, – व्यं.गो. अंदुरकर

3. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 42, – व्यं.गो. अंदुरकर

4. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पा.नं. 71 – एम्.बी. साळुंखे

5. गांधीवादी झुंझारनेते जाधवदादा दादासाहेब खाशेराव जगताप आवाहन – दिलीप रूद्राक्ष यातील लेख, पानं नं 51.

6. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 49, – व्यं.गो. अंदुरकर

7. उपरोक्त.

8. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 72 – एम्.बी. साळुंखे

9. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 67, – व्यं.गो. अंदुरकर

10. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 76 – एम्.बी. साळुंखे

11. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 71, – व्यं.गो. अंदुरकर

12. शेतकरी कामगार पक्ष आढावा व आराखडा – शंकरराव मोरे, 1948, पान नं. 5–6.

13. केशवराव जेधे, पान नं. 178–179 – य.दि. फडके.

14. केशवराव जेधे, पान नं. 182 – य.दि. फडके.

15. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 80, – व्यं.गो. अंदुरकर

16. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 81 – एम्.बी. साळुंखे

17. नवाकाळ, 29 एप्रिल, 1948.

18. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 83–84, – व्यं.गो. अंदुरकर

19. नवाकाळ, 26 एप्रिल, 1948.

20. नवाकाळ, 29 एप्रिल, 1948.

21. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 83 – एम्.बी. साळुंखे

22. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 85, – व्यं.गो. अंदुरकर

23. केशवराव जेधे, पान नं. 85 – य.दी. फडके.

24. दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, पान नं. 86–87 – एम्.बी. साळुंखे

25. आदरणीय देशभक्त जी.डी. (बापू) लाड यांचा लेख – आवाहन, पान नं. 61–62.
दिलीप रूद्राक्ष पुस्तकातील लेख

26. केशवराव जेधे, पान नं. 214–215, – य. दि. फडके.

27. आदरणीय देशभक्त जी.डी. (बापू) लाड यांचा लेख – आवाहन, पान नं. 62.

दिलीप रूद्राक्ष पुस्तकातील लेख

28. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 91 ते 93 – व्यं.गो. अंदुरकर

29. तुळशीदास जाधव – एक समर्पीत जीवन – पी.जी. पाटील,

दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ यातील लेख – एम्.बी. साळुंखे, पान नं. 122.

30. स्वातंत्र्य सैनिकांचा मुकुटमणी, यशवंतराव चव्हाण –

दे.भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ यातील लेख – एम्.बी. साळुंखे, पान नं. 151.